# मन्ना डे - भाग ५



म.डे.: माझे काका (के. सी. डे) एक अलौकिक प्रतिभावान कलाकार होते. ते काहीही गाऊ शकत असत. अगदी धृपदापासून ते कीर्तनापर्यंत काहीही ! केवळ त्यांचे मार्गदर्शन व्हावे म्हणून सैगल साब, पंकज मलिक वगैरेंसारखे गायक आमच्या घरी येत.

प्रश्न: खरंच ?

म.डे: तर, तर ! आम्ही घरच्या घरी असे मातब्बर लोक पहात असू. 'काय रे मन्ना, कसा आहेस ?'

प्रश्न: तुम्हाला सैगल आठवतात का ?

म.डे: हो तर !

प्रश्न: अगदी व्यवस्थित आठवतात ?

म.डे: ते इतकी दारू पीत आणि सिगरेट सुध्दा ओढत! पंकज मलिक पण भरपूर सिगरेट्स ओढत. ५० सिगरेट्सचा एक डबा एका दिवसात संपवून टाकत. मी सुध्दा सिगरेट ओढत असे. कारण त्या दिवसांत कलकत्त्यात सगळेच भरपूर सिगरेट ओढत. न्यू थिएटरमध्ये तर चित्रपटातील कलाकार आणि संगीत क्षेत्रातील सुध्दा आर. सी. बोराल वगैरे सदैव हातात सिगरेटचा डबा घेऊनच असत. माझे काका सुध्दा. तलत सुध्दा. सतत त्याच्या हातात ५५५ चा डबा असे. तलत एकदम छानछौकीत राहत असे. अतिशय देखणा माणूस. मुली सदैव त्याच्या मागे असत. त्याला गाण्याची उपजत देणगी होती. त्याचा आवाज नैसर्गिक आणि गोड होता.

यश ही अशी गोष्ट आहे की ती मिळाल्यावर तुम्हाला पचवता आली पाहिजे. ते फार महत्त्वाचे आहे. कारण विशेष करून आमच्या क्षेत्रात अनेक आकर्षणे भूल घालत असतात.

प्रश्न: दादा, तुम्हाला ह्या संदर्भातील काही आठवणी सांगता येतील का ?

म.डे: क्वचितच. मी माझ्या कामाकडे अतिशय गंभीरपणे पाहत असे. इतर गायक किंवा संगीतकारांपेक्षा माझे वागणे वेगळे होते. मी स्टुडिओत सर्वात प्रथम हजर होत असे. माझे गाणे जन्म घेताना मला अगदी पहिल्यापासून ते पहायचे असे. संगीत दिग्दर्शकाच्या घरच्या तालमीपासून म्हणालात तरी चालेल. आता ह्या गोष्टी विस्मरणात गेल्या म्हणायला हरकत नाही. आज संगीतकार गायक/गायिकेच्या हातात गाणे देतो, चाल सांगतो आणि त्याला/तिला म्हणतो, हे गाणे असे आहे, गा आणि हिट करून दाखवा.

प्रश्न: दादा, तुम्हाला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो अशी सर्वांच्या वतीने शुभेच्छा !

म.डे: नको, नको. मी भरपूर आयुष्य उपभोगले आहे. आता माझ्या मनात एकच विचार आहे. 'तुमार शेष विचारे आषये' (शैलजा राजन यांची बंगाली कविता. अर्थ असा की आता 'हे देवा, मी तुझ्या निरोपाची वाट पाहतो आहे.')

मला खरं विचाराल तर तुम्ही समृध्द जीवन जगला आहात ना ? आता ह्या वयात दुसऱ्यावर आपले ओझे टाकणे बरे नाही. प्रथम तुम्ही लक्षात घेतले पाहिजे की वाढत्या वयाबरोबर बऱ्याच व्याधी तुमच्या मागे लागतात. तुम्ही चांगल्या स्थितीत राहूच शकत नाही. (तरीही) मी अजून गायनचा रियाज करतो, व्यायाम करतो, सर्व काही खातो.

प्रश्न: तुम्ही दररोज व्यायाम करता ?

म.डे: अगदी दररोज करतो. परंतु तरुणपणी फुटबॉल वगैरे खेळल्यामुळे शरीर थोडे दुखावले आहे. मला 'सायाटिका' आहे. त्यामुळे दुखी आहे. माझ्यामुळे कुणाला त्रास व्हावा हे मला मुळीच आवडणार नाही. त्यापूर्वी वर गेलेले बरे !

मला ह्या अद्भुत जगाचा आनंदाने निरोप घ्यायचा आहे.

ही मुलाखत बरीच मोठी असल्यामुळे त्यातील महत्त्वाचा भाग न वगळता संक्षिप्त करण्यात आली

आहे. आणि अखेर महत्त्वाच्या दोन गोष्टी -

पहिली म्हणजे ह्या मुलाखतीपूर्वीही मी काही वेळा मन्ना डे यांना भेटलो होतो. प्रत्येक वेळा माझ्या मनात एकच विचार येतो. एवढी प्रसिध्दी आणि यश मिळूनही मन्ना डे यांचे पाय कायम जमिनीवर कसे ? तसेच चित्रपटसृष्टीसारख्या मोहमयी दुनियेत वावरूनही त्यांनी आपले चारित्र्य शुध्द कसे ठेवले ?

आणि शेवटी मन्नादा यांच्या गाण्यासारखेच त्यांचे बोलणेही अगदी मनापासून येते. त्यांचे इंग्रजी बिनचूक असते. आणि त्यांच्याबरोबर इंग्रजी बोलताना आपण एका पार्श्वगायकाबरोबर बोलतोय की शेक्सपिअरच्या शोकांतिकांचे विश्लेषण करण्यात तरबेज असणाऱ्या इंग्रजीच्या प्राध्यापकाबरोबर बोलतोय तेच लक्षात येत नाही.

मन्ना डे यांची काही गाजलेली गाणी खास अनुक्रमाशिवाय दिली आहेत:

| Song | Film |
|---|---|
| Hasne ki chah ne itna mujhe rulaaya hai | Avishkaar |
| Zindagi, kaisi hai paheli hai | Anand |
| Theher zara o jaane waale (with Asha, Madhubala Jhaveri) | Boot Polish |
| Lapak jhapak tu aare badarwa (with chorus) | Boot Polish |
| Raat gayee phir din aata hai (with Asha and chorus) | Boot Polish |
| Babu, samjho ishaare (with Kishore) | Chalti Ka Naam Gaadi |
| Yeh raat bheegi bheegi (with Lata) | Chori Chori |
| Aaja sanam (with Lata) | Chori Chori |
| Jahaan main jaati hoon (with Lata) | Chori Chori |
| Parda utthe salaam ho jaaye (with Asha) | Dil Hi To Hai |
| Dharti kahe pukaar ke (with Lata & chorus) | Do Bigha Zameen |
| Har taraf ab yehi afsaane hain | Hindustan Ki Qasam |
| Aye kaash chalte milke (with Asha) | Manzil |
| Jundariya kat-ti jaaye re | Mother India |
| Saanjh dhali, dilki lagi (with Asha) | Kaala Bazaar |
| Nain mile chaen kahaan (with Lata) | Basant Bahaar |
| Masti bhara hai sama (with Lata) | Parvarish |
| 1956, 1957, 1958, 1959 (with Lata & chorus) | Anari |
| Maama o maama (with Rafi) | Parvarish |
| Sooraj zara, aa paas aa (with chorus) | Ujala |
| Tum jo aao to pyaar aa jaye (with Suman) | Sakhi Robin |
| Mere dil mein hai ik baat (with Lata) | Post Box No. 999 |
| Jogi aaya leke sandesha Bhagwaan ka | Post Box No. 999 |
| Ek samay par do barsaaten | Jhoola |
| Yeh din, din hain khushi ke (with Suman) | Jabse Tumhen Dekha Hai |
| Zulfon ki ghata lekar (with Asha) | Reshmi Roomal |
| Na jaane kahaan tum the (with Suman) | Zindagi Aur Khwab |

| Song | Film |
|---|---|
| Dil ki girah khol do (with Lata) | Raat Aur Din |
| Woh chaand muskaya (with Lata) | Akhri Dao |
| Na to kaarvaan ki talaash hai (with Asha, Batish, Sudha, chorus) | Barsaat Ki Raat |
| Yeh ishq ishq hai (Rafi, Batish, Sudha & chorus) | Barsaat Ki Raat |
| Dil ka haal sune dilwaala (with chorus) | Shree 420 |
| Kisne chilman se maara | Baat Ek Raat Ki |
| Aye mere pyaare watan | Kabuliwala |
| Pyar hua ikraar hua (with Lata ) | Shree 420 |
| Main idhar jaoon ya (with Asha, Rafi, Aziz Naza, chorus) | Palki |
| Pee bin soona ree (with Lata) | Hamdard |
| Mud mud ke na dekh (with Asha & chorus) | Shree 420 |
| Main tere pyaar mein kya kya na bana (with Geeta) | Ziddi |
| Upar gagan vishal | Mashaal |
| Jaane wale sipaahi se poochho (with Sabita Banerji,chorus) | Usne Kaha Tha |
| Naseeb hoga mera meherbaan (with Asha & chorus) | 40 Days |
| Jhoomta mausam mast mahina (with Lata) | Ujala |
| Yeh nasheeli hawa (with Suman) | Neeli Ankhen |
| Umad ghumad kar ayee re ghata (with Lata) | Do Ankhen Barah Haath |
| Andhi hai duniya pyare, matlab ki duniya (with chorus) | Chhoti Chhoti Baten |
| Yeh hawa yeh nadi ka kinara (with Asha & chorus) | Ghar Sansar |
| Mere jeevan mein kiran banke (with Asha) | Talaaq |
| Jab dil mein nahin hai khot to phir kyoon darta hai | Bank Manager |
| Ho sakta hai kanton se bhi phool ki | Duniya Na Maane |
| Chale ja rahe hain muhabbat ke maare | Kinare Kinare |
| Tujh mein Ram, mujh mein Ram (with chorus) | Pardesi |
| Chali Raadhe rani | Parineeta |
| Qasme-vaade-pyar-wafa, sab baaten hain | Upkar |
| Pyar bhari yeh ghatayen, raag milan ke gaayen (with Lata) | Qaidi No. 911 |
| Nadiya chale, chale re dhaara (with chorus) | Safar |

हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला' ह्या महाकाव्यावर मन्ना डे यांनी उत्कृष्ट काम केले आहे. दुसरा कुणीही करू शकणार नाही इतक्या सुंदर रितीने त्यांनी कविता सादर केल्या आहेत. त्यांची चित्रपटबाह्य गीते आणि भजने म्हटलेली आपण ऐकलीच आहेत. ७०च्या दशकांत आणि नंतरही त्यांनी इतकी चित्रपट गीते गायली आहेत की वरील यादीत समावेश करणे कठीणच होईल. त्या दशकातील आणखी काही गाणी पुढीलप्रमाणे - 'अभी तो हाथ मे जाम है' ('सीता और गीता'), 'जिंदगी है खेल, कोई पास कोई फेल' (आशासोबत - 'सीता और गीता'), 'ये दोस्ती' (किशोरसोबत - 'शोले') आणि आणखीही डझनभर.

वरच्या यादीत समावेश न केलेल्या काही गाण्यांची एखादी काल्पनिक सीडी करता येईल ! रागदारीवर आधारित फिल्मी गाण्यांच्या आल्बमवर देखील म्युझिक कंपन्या गाण्यापुढे त्या त्या रागाचे नाव का लिहीत नाहीत कोण जाणे ! खालील गाणी पूर्णपणे शास्त्रीय नाही आहेत, परंतु रागदारीवर नक्कीच आधारलेली आहेत. आणि मन्ना डेंनी ती अतिशय आत्मीयतेने गायली आहेत. ही पहा:

| Song | Film | Raag |
|---|---|---|
| Tu pyaar ka saagar hai (with chorus) | Seema | Darbaari Kannada |
| Pyaar ki aag mein tan badan jal gaya | Ziddi | Darbaari Kannada |
| Jhanak jhanak tori baaje paayaliya | Mere Huzoor | Darbaari Kannada |
| Ab kahaan jayen hum (with chorus) | Ujaala | Darbaari Kannada |
| Phir kahin koi phool khila | Anubhav | Des |
| Tum gagan ke chandrama ho (with Lata) | Sati Savitri | Kalyan |
| Re man sur mein ga | Lal Patthar | Kalyan |
| Tum bin jeevan kaisa jeevan | Bawarchi | Bhinashadaj |
| Tu hai mera prem devta (with Rafi, chorus) | Kalpana | Lalit |
| Preetam daras dikhao (with Lata) | Chacha Zindabad | Lalit |
| Tu chhupi hai kahaan (with Asha) | Navrang | Malkauns |
| Bhay bhanjana | Basant Bahaar | Miyan Ki Malhar |
| Sur na saje | Basant Bahaar | Pilu |
| Aye meri zohar-e-jabeen | Waqt | Pilu |
| Aayo kahaan se Ghansham (with Archana) | Buddha Mil Gaya | Khamaj |
| Nirbal se ladayee | Toofaan Aur Diya | Malkauns |
| Tere naina talaash karen jise | Talaash | Chhaayanat |

| Song | Film | Raag |
|---|---|---|
| Poochho na kaise maine raen bitaayi | Meri Surat Teri Ankhen | Ahir Bhairav |
| Bhor aayee gaya andhiyaara (with Kishore, Harindernath, Laxmi Shankar, Nirmala Devi) | Bawarchi | Bilawal |
| Ja re beimaan tujhe jaan liya | Private Secretary | Bageshwari |
| Ketaki gulab juhi champak (with Pt Bhimsen Joshi) | Basant Bahaar | Basant |
| Laaga chunri mein daag | Dil Hi To Hai | Bhairavi |
| Phool Gendwa na maaro | Dooj Ka Chaand | Bhairavi |
| Kaun aaya mere man ke | Dekh Kabira Roya | Rageshwari |
| Pal bhar ki pehchaan | Non film | Bihag |

मन्ना डे यांचं पार्श्वगायनातील योगदान तसेच लताच्या 'भूल ना सके हम तुम्हे' ('तमाशा') यासारख्या सुंदर गाण्यांचं संगीत दिग्दर्शन लक्षात घेता, ते 'दादासाहेब फाळके' पुरस्कारासाठी योग्य उमेदवार आहेत असं तुम्हाला वाटतं की नाही ?

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. The author has also recently written another music book called Romancing The Song, which traces the

history and changing face of lyrics in HIndi Cinema, right from 1931 till now.

To buy the books, or otherwise write to the author, his email address is
manekpremchand@gmail.com